ज्योतिर्मय
Online Journal of Literature....
साहित्याचे विद्यापीठ
❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १४४ वा ❑ रविवार दि.२० जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

# वारकरी संगीत परंपरा : संगितरूपी सूरसंपदा

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा लाभलेली आहे. या परंपरेतील संगीत व कीर्तन वारसा समोर आणण्याचे कार्य अनेक संतमहंत आणि संशोधकांनी केले आहे. वारकरी संप्रदायाने भजन, कीर्तन व संगीत या माध्यमातून समाज प्रबोधन, सांस्कृतिक समृद्धी, विकास व देश घडवण्याची काम सुरुवातीपासून केले आहे. वारकरी संप्रदाय अनादी असून श्री विठ्ठल हे वारकरी संप्रदायातील भक्तांचे साध्य तर पंढरपूरची वारी आणि वारीतील भजन हे त्यांच्या भक्तीचे साधन आहे. वारकरी संप्रदायामध्ये विशेषतः संत नामदेव व संत ज्ञानेश्वर यांनी वारकरी संगीत परंपरा निर्माण केली आणि ती समृद्ध होत गेली. संत ज्ञानेश्वरानी वारकरी संप्रदायाचा पाया रचला तर संत जगद्गुरु तुकोबाराय यांनी कळस चढवला.**

वारकरी भजन परंपरेत एकापेक्षा एक सरस असे संगीतरत्न होऊन गेले आहेत. समकालीन वारकरी संप्रदायातील भजन परंपरेतील भजनसम्राट गुरुवर्य पं. कल्याणजी गायकवाड हे एक अत्यंत लोकप्रिय आणि आदरणीय वारकरी गायक व संगीत रचनाकार म्हणून ओळखले जाते. त्यांच्या अभंगगायनातील गोडी, भक्तीभाव आणि रचना-संपृक्तता हे त्यांच्या गायनाचे कलात्मक वैशिष्ट्य आहे. त्यांच्या आवाजात भक्तिरसासोबतच एक सांस्कृतिक संस्कार आणि अध्यात्मिक जाण जाणवते. त्यांनी अनेक अभंग, भारूड, गवळण, दोहे भजनातून लोकांना विठ्ठलभक्तीत सप्तसुरानी नाव्हुन टाकतात. त्यांची गायकी वारकरी परंपरेत खोलवर रुजलेली असून, त्यांनी श्रीविठ्ठल भक्तीचा प्रचार व प्रसार भजन भारूड आणि कीर्तने यांच्या माध्यमातून महाराष्ट्रभर केला आहे. त्यांना ''भजनसम्राट'' ही उपाधी त्यांच्या भक्तिरसपूर्ण गायकीमुळे लाभली आहे. त्यांना विविध कीर्तन मंडळ, वारकरी संप्रदाय, सांस्कृतिक संस्थांनी त्यांना सन्मानचिन्हे आणि पुरस्कारांनी गौरवले आहे आणि प्रतिष्ठेचा समजला जाणारा महाराष्ट्र शासनाचा कंठसंगीत हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले आहे.

संगीतभजन समृद्ध परंपरा आजच्या पिढीतील संगीतसाधना करत असलेल्या साधकांना तसेच अभ्यासकांना समजावी यासाठी वारकरी संगीत परंपरा हा उपयुक्त ग्रंथ महाराष्ट्रातील ख्यातनाम भजन सम्राट पंडित गुरुवर्य कल्याणजी गायकवाड यांनी लिहिला आहे. संगीत ही सादरीकरणाची कला आहे परंतु त्यावरील संशोधन पद्धतीने लिहिल्यामुळे ते एक लेखक म्हणूनसुद्धा त्यांनी लेखीसादरीकरण समर्थपणे केले आहे. वारकरी संगीत परंपरा हा ग्रंथ संप्रदायातील व मराठी वाङ्मयातील संगीतशास्त्रीय, गायनशैली, भक्तिसंगीताचे ऐतिहासिक व सांगीतिक विकास आणि कीर्तन परंपरेवरील चिंतन याबाबत संशोधन पर ग्रंथ आहे. हा ग्रंथ वारकरी परंपरेत संगीत, तान, चाली आणि रसगर्भ गायनाचा अभ्यासपूर्ण दस्तऐवज म्हणून उल्लेखनीय आहे.

प्रस्तुत ग्रंथामध्ये एकूण अकरा प्रकरणे असून ७८ पानांचा अतिशय मौलिक ग्रंथ असून पुढील पिढीला मार्गदर्शक ठरणार आहे. प्रस्तुत विषयावर संशोधन करणारे अनेक छोटेमोठे ग्रंथ उपलब्ध आहेत. तथापि, गुरुजींनी लिहलेल्या आणि पुण्याच्या शिवस्पर्श प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या या ग्रंथाचे स्वागत करताना एक विद्यार्थी म्हणून मला मनस्वी आनंद होत आहे. हा ग्रंथ प्रत्येक वारकऱ्याने, संगीत साधकाने व संशोधकाने आपल्या वाचनात आणि आपल्या ग्रंथालयात संग्रहीत करावा असा आाहे. गुरुजींनी आध्यात्मिक, सामाजिक व सांगितीक भूमिका मांडताना वारकरी संगीत केवळ भक्तिगीत नाही, तर समाजजागृतीचे माध्यम आहे, असे प्रतिपादन केले आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, तुकडोजी महाराज, गाडगे महाराजांविषयी संगीत साधनेतून व सादरीकरणातून सामाजिक सुधारणेला प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या मते, वारकरी संगीतात निरपेक्ष सेवाभाव, शुद्धचित्तानं गायन, आणि भावभक्तीची समन्वित साधना ही उद्दिष्टे आहेत.

प्रस्तुत ग्रंथ कसा उदयास आला, हा ग्रंथ काही मिनिटांचा तासांचा किंवा दिवसांचा प्रवास नाही. तर हा गुरुजींचा जीवन प्रवास आहे. या ग्रंथाची गौरवगाथा व पार्श्वभुमी समजाऊन घेण्यासाठी आपल्याला लेखकाचा (लाईक जर्नी) जिवन प्रवास समाजावून घ्यावा लागेलं. या म्हणी प्रमाणे, प्रस्तुत ग्रंथावर लेखकाने अनेकठिकाणी आपल्या जादुई आवाजाने भजन सादर केले आहे. संगीत म्हणजे काय? हे श्रोत्यांना आकलन व्हावे म्हणून, लेखकाने हा ग्रंथ आपल्या हाती सुपूर्द केला आहे. गुरुजी स्वतः गायक असल्यामुळे गायन सादर करून, चिंतन, मनन अभ्यास करून त्याचा सार आपल्याला ग्रंथातून वाचक म्हणून प्रचिती येते. त्यांच्या विचाराची प्रगल्भता व सादरीकरणाचे सौंदर्य पाहायला मिळते. ती प्रगल्भता लेखकाच्या अंतर्मनातून पाझरते व ती थेट वाचकांच्या मनापर्यंत हृदयापर्यंत पोहोचते.



संगीत साधना करत असताना त्यांना बालवयात जे अध्यात्मिक व सांगितीक संस्कार झाले व जतन करुन संगीत साधना करत राहिले. त्यात त्यांना मोठे यश प्राप्त झाले. हे आपण सर्व जाणतो आहोत. त्याचबरोबर त्यांनी ज्ञानोबा तुकोबांच्या वारकरी शिक्षण परंपरेला व वैकुंठवाशी जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून संप्रदायातील किंवा संगीतप्रेमी नवगायकांना विनामूल्य संगीताचे शिक्षण दिले. आज ती सगळी मुलं देशभरात संगीत क्षेत्रात कार्यरत आहेत आणि तेवढ्याच उंचीचे झाली आहेत. आपल्याला स्वतः प्राप्त झालेले ज्ञान इतरांपर्यंत पोहोचावे हा शुद्ध हेतू ठेवूनच आदरणीय गुरुजीनी वारकरी संगीत परंपरा हा ग्रंथ आपल्यासमोर सादर केला आहे. गुरुजी यांनी वारकरी संगीतामध्ये नवनवीन बदल करून अभंग व गवळणी विशिष्ट रागप्रणाली मधून लोकप्रिय केली आहेत. त्यांच्या गायनशैलीत हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचा प्रभाव अधिक जाणवतो. या ग्रंथातून आपल्या जीवनातील चढउतारा बरोबरच वारकरी संप्रदायातून उदयास आलेल्या एका वारकरी साधकाची जीवनगाथा, जडणघडण, तत्कालीन परिस्थीती, समोरील ध्येय व उद्दिष्ठ्ये, बरोबरच आव्हाने यांची एक सांगड या ग्रंथात पहावयास मिळते.

या प्रास्ताविकेनंतर पुढील प्रकरणामध्ये, प्रामुख्याने त्यांनी वारकरी संप्रदायामध्ये संगीताची भूमिका स्थान व त्याचे साधक आणि आतापर्यंतचा प्रवास याचा परिचय करुन देतात. त्यांनी हे शिवधणुष्य समर्थपणे पेलले याची प्रचिती वाचक म्हणून येते. गुरुजी यांनी तत्कालीन परिस्थीतीवर मात करुन पुढील प्रवास किती जोमाने सुरू केला व वारकरी संप्रदायातील संगीत परंपरा किती समर्थपणे उंचीवर नेऊन ठेवली हे लक्षात येते. आलेल्या सर्व आव्हानांना त्यांनी किती लिलया पेलले, याचा प्रत्यय प्रस्तुत ग्रंथात येतो.

संतांचा परिचय देताना गुरुजींनी वारकरी संप्रदायातील भजन प्रकार कसे उदयास आले. त्याचबरोबर त्या भजनपरंपरेमधील सर्वश्रेष्ठ गायकांची परंपराचा परीचय करून देतात. त्याशिवाय आळंदी ते पंढरपूर वारीतील संगीत भजन परंपरा व त्यातून उदयास आलेले वेगवेगळे वाद्यसंगीत आणि चक्रीभजन याचाही त्यांनी ओहापोह या ग्रंथात केला आहे. एवढेच नाही तर काकडा आरतीपासून हरिपाठपर्यंत आणि विदर्भापासून मराठवाड्यापर्यंत, याशिवाय महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रांतामध्ये संगीत परंपरा कशी जोपासलेली आहे मग विदर्भ,मराठवाडा,पश्चिम महाराष्ट्र किंवा उत्तर महाराष्ट्र,खानदेश येथील संगीत परंपरांची सांगड एक संशोधकपद्धतीने सादर केली आहे. त्यांची संशोधकवृत्ती थांबली नाही तर त्यांनी स्वतंत्र्योत्तर काळात वारकरी संप्रदायात होत असलेले बदल आणि बदलत गेलेले संगीत जीवन, सांगितिक जडणघडण, दूरदृष्टी व दृष्टीकोनाचा विकास यावर विशेष प्रकाश टाकला आहे.

योग्यांची माऊली संत ज्ञानेश्वर महाराज आणि संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकोबाराय यांच्या विचारांचा प्रभाव गुरुजींच्या अंतर्मनावर पडून त्यांनी सांगितीक प्रगती, ही आपल्या सर्व विद्यार्थ्यांसमोर संशोधकांसमोर एक आदर्श म्हणून उभी आहे आणि त्यातूनच आपण आपल्या जीवनातला रोडमॅप तयार करून आपला जीवन प्रवास करावा असा संदेश प्रत्येक वाचकाला मिळतो. शेवटचे प्रकरण नवीन संदर्भासहित वारकरी संगीतासमोरील आव्हानांची मांडणी करतात. संगीत साधनेतून देशाची उभारणी कशाप्रकारे अपेक्षीत आहे, याचा अभ्यास पहायला मिळतो. मानसशास्त्रीय दृष्ट्या संगीत हे तणावावर मात करण्यासाठी अत्यंत प्रभावी साधन मानले जाते. वारकरी संगीत हे राग, दुःख, नैराश्य, यासारख्या भावनांवर रामबाण उपाय म्हणून काम करते. वारकरी संगीताने शास्त्रीय व भक्ती संगीताने मानसिक शांतता टिकवण्यासाठी किंवा भावनिक संतुलनासाठी आणि मेंदूवरील परिणाम विशेषतः डोपामीन आणि सेरोटोनिंन या आनंददायक हार्मोन्स निर्माण करतात जे तणावाला दूर करण्यास मदत करतात. त्याचबरोबर मनाची सकारामक्ता,ज्ञानधारणा, योग, साधना याबाबत देखील संगीत अध्यात्मिक उन्नती वाढवण्यासाठी मदत करत. तरुण पिढीला संगीत आणि अध्यात्माकडे वळवण्याचे कार्य त्यांनी भजनद्वारे केले आहे. त्यांनी ग्रामीण भागात वारकरी परंपरेचा संवाद आणि शिक्षण पोहोचवले. पं. गु. भजनसम्राट कल्याणजी गायकवाड हे केवळ भजनकार नव्हे तर वारकरी परंपरेचे श्रद्धास्थान आहेत. त्यांचे कार्य, गायन आणि लेखन वारकरी संप्रदायातील भक्तिसंगीताचे जतन व संवर्धन करणारे आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक तरुणांना संतवाङ्मय आणि संगीत यांच्याशी जोडले गेले आहे. नियोजन, अनुशासन, सेवा व विकास हा वारकरी संगीताचा आत्मा आहे. पुढील सांगीतिक वाटचालीसाठी,संगीत व राष्ट्र उभारणीसाठी प्रस्तुत ग्रंथ दिशा दर्शक व प्रेरक आहे. या प्रस्तुत ग्रंथाला एक संशोधनाची बैठक सुद्धा प्राप्त झालेली आहे. या मध्ये प्रत्येक प्रकरणात निवडक संदर्भ पान नंबर सहीत दिलेले आहेत. जर कोणा संशोधकाला वाचकाला वारकरी संप्रदाय व संगीत किंवा निगडीत विषयावर संशोधन करण्यासाठी हा एक मैलाचा दगड ठरेल, यात शंका नाही.









# जात्यावरच्या ओव्या......

आताच्या पलीत
भाऊ नाही बहिणीचा
खिशाबंदी चोळी
वाडा पुसे मेव्हणीचा ||१७६||

बांगड्या भरते
मी त्त रुपयाची एक
कासार पुसतो
कोण्या सावकाराची लेक? ||१७७||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# रेषा नात्यांचा आरसा




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

**ज्योतिर्मय साहित्य**

शाळेत शिकताना आपण विविध प्रकारच्या रेषा अभ्यासतो. उदाहरणार्थ भूगोलातील अक्षांश-रेखांशाच्या उभ्या आडव्या रेषा. भूमितीतील विविध कोनांच्या रेषा. लहान मुलं वह्या पुस्तकांवर किंवा भिंतीवर रेषा मारून ठेवतात. शिक्षकही आपले पेपर किंवा वह्या तपासताना त्यावर बरोबर किंवा चूक असल्याच्या खुणा करतात. त्याही रेषाच असतात. पण या रेषा या फक्त भूगोलात किंवा गणितात नसतात. त्यांचा संबंध थेट मानवी जीवनाशी देखील असतो. त्या रेषा माणसांच्या मनात असतात. नात्यांमध्ये असतात. त्या भावनांच्या, सीमांच्या आणि समजुतीच्या असतात. रेषा म्हणजे एक वेध कधी मोजमापाचा, कधी अंतराचा, तर कधी जिव्हाळ्याचा. आपण जगताना अशा अनेक रेषा चुकवतो, आखतो, पुसतो, आणि कधी कधी स्वतःभोवतीही आखून घेतो.



रेषा तीन प्रकारच्या असतात असं एक सुंदर तत्त्वज्ञान सांगतं.

पहिली दगडावरची रेषा जी कधीच पुसली जात नाही. ती कारागीर छिन्नी हातोड्याच्या साहाय्याने दगडावर कोरतो. किंवा कधी कधी नैसर्गिकरित्या देखील निर्माण झालेली असते.

दुसरी वाळूवरची रेषा जी काही वेळाने मिटते. वाहणारा वारा, माणसांच्या पाऊलांनी, प्राण्यांच्या पाऊलांनी या रेषा काही तासातच मिटून जातात. पुन्हा वाळू एकसारखी दिसते.


आणि तिसरी पाण्यावरची रेषा जी काही क्षणांतच नाहीशी होते. पाण्यावर काठी मारली तर क्षणभर पाणी दुभंगल्यासारखे वाटते. ही पाण्यावरील रेषा काही क्षणातच नाहीशी होते. पुन्हा सगळे पाणी एकसारखे दिसते.

आपले राग, वाद, गैरसमज हे कोणत्या रेषेत बसतात?

पती-पत्नीमधील वाद वाळूवरच्या रेषेसारखा असावा काही तासांत मिटणारा.

आई-वडील आणि मुलांमधील राग पाण्यावर काठीने मारलेल्या रेषेसारखा असावा - क्षणात विरघळणारा.

पण काही राग मात्र दगडावर कोरल्यागत मनावर ठसतात... ते नात्यांच्या अंताला कारणीभूत ठरतात. दोन भावांमध्ये एकदा शेतातील बांधावरून भांडण झाले. बाब अगदी किरकोळ होती. समजून घेऊन, बोलून किंवा संवादाने प्रश्न सहज सुटला असता. पण अभिमान आणि अहंकार आड आला. क्षुद्र स्वार्थ भावाच्या उदात्त नात्यावर मात करून गेला. प्रकरण न्यायालयात गेले. तिथे मनासारखा न्याय मिळाला नाही म्हणून वरच्या कोर्टात गेले. या सगळ्या प्रकरणात सगळी प्रेमळ नाती मातीमोल झाली. न्यायालयाच्या खर्चासाठी शेतीचा तुकडा विकण्याची वेळ आली. पण कोणीही माघार घेतली नाही. उलट कोणी त्याबद्दल विचारले की हे म्हणायचे मी माझ्या भावाशी दहा वर्षांपासून बोलत नाही. ही काय अभिमानाने सांगायची गोष्ट आहे ? ही झाली दगडावरची रेषा. ज्याबद्दल आपण अभिमानाने बोलतो, माझ्या शब्दात काडीमात्रही बदल होणार नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे. नात्यांमध्ये अशा रेषा तयार होऊ देता कामा नये.. **(क्रमशः)**



## दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# गुरूलक्षण

**ज्योतिर्मय साहित्य**

दशक पाच, समास दोन

नमस्कार

वेद असोत, शास्त्र असोत किंवा थोर सत्पुरुष असोत या सर्वाचा आत्मस्वरूपाचा अनुभव एकच असतो. ज्ञान या हे सर्वाचे सारखेच असते. साक्षात्कार या बाजूने विचार केला तर वेद,शास्त्र व सत्पुरुष ज्ञानानुभवाने एकरूप झालेले असतात. म्हणून वेदांचे रहस्य, शास्त्रांचे विवेचन,सत्पुरुषाचा अनुभव आणि सद्गुरूंचा ऊपदेश

सर्व एकरूप असले पाहिजेत. जो आपल्या शिष्याला साधनात कसे रहावे हे शिकवत नाहीत असे बुवाबाजी करणाऱ्या ढोंगी लोकांच्या पासून सावधच रहायला हवे.

वर्षानुवर्षे अशा बुवाबाजी मंडळींच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे.

शास्त्रप्रचीति, गुरूप्रचति आणि आत्मप्रचिती यांचा मनोहर संग़म ज्या पुरूषांच्या ठिकाणी आढळेल तीच उत्तम लक्षणांनी संपन्न अशा या सद्गुरूची खुण आहे.

सद्गुरू शरणम् शरद ऋतूत आकाशात दिसणारा मनोहर चंदामामा बघा कसाविलोभनीय दिसतो. अशा चंद्रमाचे वेदांच्या काळात पासून अनेक पिढ्यानपिढ्या त्याचे दर्शन घेत आहेत. पुढील कित्येक पिढ्या चंद्राचे दर्शन घेत रहाणार आहेत. प्रत्येकाचे मन त्याच्या सौदर्याने भारावून जाते. पौर्णिमेचा चंद्र द्रुष्य विश्वाचा भाग आहे. शाश्वत सच्चिदानंदस्वरूपामध्ये काहीच फरक पडत नाही. म्हणून श्रुतीमध्ये आणि संतांच्या ग्रंथामध्ये सांगितलेला स्वरूपानुभव, आपल्या सद्गुरूचा स्वानुभव आणि आपला स्वतः चा अनुभव मुलत: एकरूपच असले पाहिजेत. काही वेळा असे दिसते कीएखादा माणूस अद्वेत वेदांन्त सांगण्यामध्ये अलौकिक यश मिळवतो. **(क्रमशः)**

# शंका न ठेवता नाम घ्यावे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

नामस्मरण करायला सांगितले की लोक सबबी सांगतात. पण खरोखर, नामस्मरण करण्याच्या आड काहीच येत नाही. काम करीत असतानासुद्धा उगाचच इतर विचार मनात येतातच ना ? मग तसेच नामस्मरण करायला कोणती अडचण आहे ? उगाच दुसरे विचार करण्यापेक्षा भगवंताचे नाम घ्यावे हे बरे नाही का ? वेळ सापडताच तो व्यर्थ गप्पागोष्टीत न घालविता नामस्मरण करावे; श्रद्धा ठेवून करावे. दोन प्रवासी पायी जात होते. त्यांना भूक लागली. जाताना एक आंबराई लागली. त्यांनी मालकाला विचारले, 'आंबे घेऊ का ?' मालक म्हणाला, 'पंधरा मिनिटांत जितके आंबे खाता येतील तितके खा.' दोघांपैकी एक होता, तो मालकाजवळ चौकशी करू लागला; या शेताला पट्टी किती, मालक कोण, वगैरे पुष्कळ विचारपूस करू लागला. दुसरा मात्र भराभर आंबे खाऊ लागला. इतक्यात पंधरा मिनिटे झाली. मालकाने सांगितले, 'वेळ संपली, आता तुम्ही जा.' एकाचे पोट भरले, दुसरा मात्र उपाशी राहिला. या गोष्टीवरून हे ध्यानात घ्यायचे की, नुसते प्रश्न विचारण्यापेक्षा, श्रद्धा ठेवून नाम घेऊ लागावे. नामाचा अर्थ आपल्याला जरी कळला नाही, तरी तो भगवंताला कळतो. म्हणून नामाचे महत्त्व कळो वा न कळो, नाम घेत राहावे. ध्रुवाने काय केले ? नारदवचनावर विश्वास ठेवून नामस्मरण प्रेमाने करू लागला. तो इतर विचारांच्या, शंकाकुशंकांच्या नादी लागलाच नाही. 'एक तत्त्व नाम' हेच त्याने धरले, म्हणून त्याला नारायण प्रसन्न झाला. संत निःस्वार्थी असतात. ते तळमळीने सांगतात. त्यावर आपण श्रद्धा ठेवावी आणि नाम घ्यायला सुरुवात करावी आणि अखंड नामातच राहावे.

नाम किती दिवस घेत राहावे ? नाम सोडावेसे वाटत नाही तोपर्यंत ते घ्यावे. नामात रंगून जाईपर्यंत नाम घ्यावे. नामस्मरणात रंगला की नाम सुटणारच नाही. भगवंताचे नाम हेच श्रेष्ठ आहे. त्या नामात रंगेल तोच खरा. चरित्र विसरले तरी चालेल पण नाम विसरू नये, कारण नामात सर्व चरित्र साठविलेले आहे. ज्ञान, उपासना, कर्म वगैरे मार्ग आहेत, पण सर्वांत नामस्मरण हे सोपे साधन आहे. एक मोठा किल्ला होता. तो अभेद्य होता. मुंगीलाही आत प्रवेश होणे अशक्य असा तट होता. पण त्याला एक मोठा दरवाजा होता. त्याला एक मोठे कुलूप होते. एकाला त्याची किल्ली मिळाली; मग प्रवेश सुलभ झाला. तसे नाम ही किल्ली आहे. परमार्थ कितीही कठीण असला तरी नामाने तो सुसाध्य असतो. नामावर प्रेम आणि श्रद्धा बसत नाही अशी तक्रार करतात. संतवचनावर विश्वास ठेवून अखंड नाम घ्यावे, त्यानेच समाधान होईल.

आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच, पण त्या वाचून अडून बसू नये.

# || संत महात्म्य ||

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

**ज्योतिर्मय साहित्य**

आधी चरे, पाठी प्रसवे।
कैसी प्रतिदिनी गाभास जायेरे।
विउनियां वांझ जालीरे।
ती उन्हाळा मासां वोळलीरे कान्हो ।।१।।
दुहतां पान्हा न संवरेरे ।
पैल पर्वता सुटले झरेरे कान्हो ।।२।।
मोहें वाटायाच्या चाड़ेरे ।
दोहीं तयावरि पडेरे ।
वत्स देखोनि उफ़राटी उडेरे ।
तया केलीया तिन्ही बाडेरे कान्हो ।।३।।
तिहीं त्रिपुटी हे चरतां दिसेरे ।
तिहीं वाडियां वेगळी बैसेरे ।
ज्ञानदेव म्हणे गुरुतें पुसारे ।
ते वोळतां लयलक्ष कैसेरे कान्हो ।।४।।

आपण सुखी आहोत काय?

व्यवहारात बरेचदा आपण परिचित व्यक्तीला, कसे आहात? हा प्रश्न विचारतो. तोही त्याला व्यावहारिक उत्तर मजेत आहे! असेच देतो. पण ,खरोखरच आपण सुखात, मजेत आहोत काय ? या प्रश्नाचे उत्तर हुडकावयाला गेलो तर किती लोक खरेच सुखी सापडतील?

लौकिक अर्थाने सर्व विलासांची साधने, भौतिक सुखाची साधने, आरोग्य सुविधा, धन मुबलक प्रमाणात उपलब्ध असूनही, आपण खरे सुखी नाहीत. याचे कारण काय असावे?

मुळात सुख म्हणजे तरी नेमके काय? याही प्रश्नाचे उत्तर आपण शोधायचा प्रयत्न करू.

सुख म्हणजे एक इच्छा तृप्त झाली, आणि अद्याप दुसऱ्या इच्छेचा जन्म झाला नाही, या मधल्या अवस्थेतील आनंदाचा अनुभव म्हणजे सुख

म्हणजे सुख मिळण्यासाठी किंवा मिळालेले सुख टिकण्यासाठी आपल्या मनात इच्छांचा प्रादुर्भाव दीर्घकाळापर्यंत व्हायला नको. म्हणजे जिथे इच्छा तिथे असमाधान, किंवा दुःख. म्हणूनच निरीच्छ योगी हे मनात कोणतीही इच्छा धरीत नाहीत. निरपेक्ष भावाने राहतात. म्हणून ते सुखी होतात. याउलट ,आपण सर्व जगता कडून विविध आणि वारंवार अपेक्षा करत राहतो. त्या पूर्ण व्हाव्यात अशी इच्छा सतत मनात धारण करतो, आणि म्हणून आपण सुखी राहू शकत नाहीत.

कशामुळे माणूस दुःखी होतो हे आपणास कळाल्यानंतर आता आरोग्यपूर्ण मन कसे असते हेही पाहू. आरोग्यपूर्ण शरीर हे लवचिक, चपळ, वेगवान हालचाली करू शकणारे असे असते. या उलट ज्या मनात एकाच वेळी अनेक विचारांचा उद्भव होतो, मन चंचल असते, विचारांचे काहूर मनात माजते, डोके भणाणून जाईस्तोवर मनात विचारांचे थैमान चालते, असे चंचल मन हे आजारी मनाचे लक्षण आहे. आरोग्यपूर्ण मनाचे नव्हे. चंचलता आणि चपळता शरीरासाठी आरोग्यपूर्ण असण्याचे संकेत देतात तर निष्पन्द निर्विचार मन हे आरोग्यपूर्ण मनाचे संकेत आहेत. आपल्या डोक्यात येणारे बहुतांश विचार हे बिनकामी असतात. विचारांचा हा कचरा आपण विनाकारण सदैव वागवत असतो. आपले विचार हे विषयाकडे, म्हणजेच व्यक्ती, विषय व वस्तू याविषयी समर्पित असतात. आणि म्हणूनच हे दुःखाचे मूळ सुद्धा आहे.

संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींचा आज जो अभंग आपण सेवेसाठी घेत आहोत तोही मनाच्या अवस्थेबद्दल विचार करायला लावणारा आहे. म्हणूनच वरील विवेचन केले आहे.

पूर्वीच्या काळी गुढ बोलणे, रूपकात्मक बोलणे, सांकेतिक बोलणे याचा सर्रास वापर सामान्यपणे लोकांत असायचा. याशिवाय अध्यात्मिक अनुभव हे, अपात्र माणसांना सांगून उपयोगाचे नाहीत व त्यास ते कळणारही नाहीत, म्हणून गुढार्थाने बोलण्याचा प्रघात होता.

**(क्रमशः)**

# || निरूपण ||



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**जगदम्ब नमस्तुभ्यं मे दृष्टिविषयो भव।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं मे वाणीविषयो भव।। ४८ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या दृष्टीचा विषय हो. जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या वाणीचा विषय हो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रीगुरुणाभिपूजिते।**
**सुराराध्ये कुलाराध्ये समर्चिते नमो नमः।। ४९ ।।**

हे श्रीगुरुंनी अभिपूजित जगदंबिके, तुला नमस्कार असो. देवांची आराध्य, कुलाची आराध्य,समर्चिते अशा तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रव्या कथा मया तव।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं कथ्या कथा मया तव।। ५० ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझी कथा मी ऐकावी. श्रीरेणुके, तुला नमस्कार असो. तुझी कथा मी सांगावी.

**जगदम्ब नमस्तुभ्यं कुलरक्षणहेतवे।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं नित्यमुत्कर्षहेतवे।। ५१ ।।**

कुलाच्या रक्षणासाठीजगदंबिके, तुला नमस्कार असो. नित्यउत्कर्षासाठी श्रीरेणुके, तुला नमस्कार असो.

# आरोग्य संजीवनी



## कफ सिरप प्यायल्यावर पाणी पिणं योग्य की अयोग्य?

**ज्योतिर्मय साहित्य**

पावसाळ्यात हवेतील वातावरण बदलामुळे सर्दी-खोकला अशा समस्या लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच होते. जास्तीत जास्त लोक खोकला दूर करण्यासाठी कफ सिरप पितात. पण कफ सिरप प्यायल्यानंतर जास्तीत जास्त लोक एक चूक करतात. ही चूक म्हणजे लोक कफ सिरप प्यायल्यानंतर पाणी पितात. पण कफ सिरपनंतर पाणी पिणं खरंच योग्य असतं अयोग्य? आज आपण हेच जाणून घेणार आहोत.

खोकला लगेच शांत करण्यासाठी लोक वेगवेगळे सिरप घेतात किंवा घरात काही सिरप तयार करतात. या सिरपने घशाला-छातील लगेच आराम मिळतो. खोकला लगेच दूर होतो.

खोकला दूर करण्यासाठी सामान्यपणे मध, ग्लिसरीन आणि काही झाडांचा अर्क जसे की, तुळशी, पुदीना, आलं यांचा वापर केला जातो. या गोष्टींनी घशाला लगेच आराम मिळतो आणि खोकला शांत होतो.

कफ सिरप जरा घट्ट तयार केलं जातं. जे शरीरात जाऊन आरामात आपलं काम करतं. पण त्यावर जर पाणी प्याल तर त्याचा प्रभाव कमी होतो. हे सिरप सेवन केल्यावर घशात एक सुरक्षा कवच तयार होतं. ज्यामुळे घशाला उष्णता मिळते आणि आराम मिळतो.




संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

अशात एक्सपर्ट सांगतात की, कफ सिरप प्यायल्यानंतर पाणी अजिबात पिऊ नये. कारण याने सिरपचा प्रभाव कमी होतो. याने काहीच फायदा मिळत नाही.

नॅचरल पद्धतीने तयार केलेलं कफ सिरप श्वास नलिकेत अडकून पडलेला कफ पातळ करून मोकळा करतं. तसेच घशाला आराम मिळतो आणि खोकला कमी होतो. तसेच इन्फेक्शनपासून बचाव होतो आणि घशातील खवखवही दूर होते.

# ||श्री राम कथा||



वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रथम त्याने तलवारीस आपल्या वस्त्राने स्पर्श करून धरले. अनेक दिवस गेले पण इंद्र आला नाही. आता त्याला ती तलवार रोजच सोबत नेणे आणण्याची सवय झाली. एकदा त्याने ती तलवार वापरून फळे तोडली. हळू हळू त्याचे मनातील अहिंसा भाव गेला,व त्याचे जवळ हिंसेने घर केले. त्याने अनेक वर्षाने मिळवलेली सिद्धी नष्ट झाली ना. हा धारनेचा दोष आहे. सीता म्हणे या धनुष्याने तुमचे असे होऊ शकते ना? तुमचा अधिकार मोठा आहे. तुम्हाला मी उपदेश करावा इतकी मोठी मी नाही. राम म्हणाले मला प्रवृत्ती व निवृत्ती धर्म यांचे पालन करावे लागते. दुष्ट प्रवृत्तीला दंडित करण्या साठी मला शस्त्र धारण करावेच लागते. सीतेला ते पटत नव्हते. अचानक राम विषयांतर करतात. दुर एक टेकडी दाखवितात.सीता म्हणते मला हे सांगू नका. प्रभु राम म्हणतात ती टेकडी पांढरी दिसते. सिता म्हणाली अहो असेल पांढऱ्या मातिची. प्रभु म्हणाले. नाही ग इथे जवळपास अशी पांढरी माती नाहीये मग टेकडीच पांढरी कशी. चल पाहू. जवळ जाऊन पाहिले तर तीथे असंख्य मानवी हाडांनी टेकडी बाणली होती. तिथे मानवी देहाचे सापळे होती. सीता ते पाहून घृणा करू लागली. सिता म्हणाली एव्हढ्या माणसांना कोण दुष्टांचे मारले?प्रभु राम म्हणाले वनात अनेक ऋषी राहतात. त्यांच्या यज्ञाचा विध्वंस हे राक्षस. ऋषी यज्ञ करताना, साधना तप करताना शत्रू उचलू शकत नाहीत. त्यांना हे राक्षस मारतात. त्यांच्या पत्नीला पळवून नेतात. ही टेकडी त्यांच्या हाडांची आहे. सीता म्हणे इतके हे राक्षस निर्दयी कसे? त्या ऋषींचा त्यात काय दोष. **(क्रमशः)**

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

## फुलमाला....



डेलिया फुल...

डेलियाचे आकर्षक सौंदर्य,
उल्हसित करते आपले मन.
विविधरंगी या फुलांमुळे,
खुलती आपले अनेक क्षण.

प्रसन्न रंग, कोरीव पाकळी,
सजावटीत या फुलांना मान.
मनमोहक डेलियाचा डौल,
नाजूक हिरवेगार शोभे पान.

सौ. माधुरी म.इनामदार, मिरज.

# कायदे मंडळाच्या मंदिरातच, कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल वर्धा

**ज्योतिर्मय साहित्य**

विधिमंडळ किंवा संसद हे जनतेच्या इच्छा आकांक्षेंचे प्रतिनिधित्व करणारे चर्चेचे सर्वोच्च व्यासपीठ. या व्यासपीठामध्ये लोकप्रतिनिधींनी जनतेचे प्रश्न मांडावे, प्रश्नांची सोडवणूक करावी, अशी रास्त अपेक्षा जनतेची असते. मात्र हल्ली विधिमंडळात कामकाज कमी, गोंधळ जास्त असा प्रकार सुरू झाला इतकचं नव्हे तर विधिमंडळात हाणामारी देखील होऊ लागली. त्यामुळे विधिमंडळाला आखाड्याचे स्वरूप आले आहे. राजकीय कुरघोडी आणि नेत्यांच्या अहंकारापुढे लोकांचे प्रश्न बाजूला राहत असल्याचा आजवरचा अनुभव आहे. त्यामुळे सरकार आणि विरोधकांनी संघर्ष जरूर करावा; परंतु विधिमंडळाच्या मंचावर सामान्य माणसांच्या प्रश्नांना प्राधान्य दिल्यास आणि ते सोडवण्यासाठी ताकद पणाला लावल्यास संघर्ष अर्थपूर्ण ठरेल. त्यासाठी विधिमंडळातील प्रमुख नेत्यांनी पुढाकार घेतला, तर ते अशक्य नाही.

राज्य विधिमंडळाच्या शेवटच्या दिवशी

राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाचे आमदार तथा माजी मंत्री जितेंद्र आव्हाड आणि भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांत विधानभवनातच जोरदार हाणामारी झाली आहे. विधिमंडळाचे अधिवेशन चालू असताना विधानभवनाच्या परिसरात आव्हाड आणि पडळकर यांचे कार्यकर्ते समोरासमोर आले. यावेळी आव्हाड यांचा कार्यकर्ता नितीन देशमुख यांना मारहाण करण्यात आली. तसेच त्यांना शिवीगाळही झाली. या घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे.

आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांचे कार्यकर्ते एकमेकांविरुद्ध चक्क विधानभवन परिसरातील लॉबीमध्ये भिडल्याचं पाहायला मिळालं. यावेळी, पडळकर समर्थकांकडून जितेंद्र आव्हाड यांचा कार्यकर्ता असल्याच्या नितीन देशमुख यांना मारहाण करण्यात आली. त्यानंतर, दोन्ही बाजूने शिवीगाळ झाल्याचं पाहायला मिळाल, यावेळी येथील सुरक्षा रक्षकांनी पुढे येत ही भांडणे सोडवली. मात्र, तोपर्यंत घटना कॅमेऱ्यात कैद झाली आणि काही क्षणातच हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. कायदेमंडळाच्या मंदिरातच कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले. ज्या लोकांनी कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आहे, तेच लोक कायद्याचे उल्लंघन करत असतील, तर समाजातील कायदा आणि सुव्यवस्थेवर त्याचा नकारात्मक परिणाम होतो.


लोकशाहीमध्ये कायद्याचे पालन करणे आवश्यक आहे, आणि त्याचे उल्लंघन झाल्यास लोकशाही मार्गावर नकारात्मक परिणाम होतो.


संघर्षाचे अनेक मुद्दे असले, तरी अधिवेशन हे संघर्षासाठी नव्हे, तर चर्चेतून प्रश्न सोडवण्यासाठी असते, याचे भान ठेवायला हवे. राजकारणात संघर्ष अपरिहार्य असतो आणि तो अनेक पातळ्यांवरचा असू शकतो. लोकशाही व्यवस्थेमध्ये विधिमंडळाचे महत्त्व अनन्यसाधारण असते आणि त्याची प्रतिष्ठा जपण्याचे आव्हान सर्व संबंधितांपुढे असते. जे प्रश्न रस्त्यावर सुटू शकत नाहीत, त्यांच्या सोडवणुकीसाठी विधिमंडळाच्या अधिवेशनात संधी घेणारे नेते असतात. संसदीय आयुधांचा प्रभावी वापर करून बहुमत नसतानाही अशा प्रश्नांची सोडवणूक करून घेतल्याची असंख्य उदाहरणे महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या इतिहासात सापडतील. अल्पमतात असतानाही प्रभावी मांडणी करून सत्ताधाऱ्यांना विधेयके मागे घेण्यास लावण्याचीही उदाहरणे आहेत.

परंतु, काळाच्या प्रवाहात या गोष्टी मागे पडत गेल्या. विधिमंडळ हे प्रश्नांच्या सोडवणुकीचे व्यासपीठ आहे, याचाच विसर पडत गेला. राजकारणातले सौहार्द कमी होऊन राजकीय विरोध शत्रुत्वाच्या पातळीवर पोहोचल्यामुळे एकूण संसदीय कामकाजातले निकोप वातावरणही कधीच लयास गेले. काही वर्षांपूर्वी उत्तर प्रदेश, बिहारच्या विधिमंडळांमध्ये जे चित्र दिसत होते आणि आपण त्यांना हसत होतो ते आता आपल्याही विधिमंडळात दिसू लागले आहे. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचे अनेक पातळ्यांवरील

अधःपतन गेल्या काही दिवसांमध्ये सुरू आहे. त्याला छेद देण्याचे काम विधिमंडळाच्या पातळीवर व्हायला हवे आणि त्या माध्यमातून विधिमंडळाची प्रतिष्ठाही वाढीस लागायला हवी. जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य दिले, तरच ते शक्य होईल. एकंदरीत,

कायदेमंडळात कायदा-सुव्यवस्थेचे धिंडवडे ही एक गंभीर समस्या आहे, ज्यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

### शांतिनिकेतन ते विश्वभारती

थोरांची चरित्रे, राष्ट्रप्रेम, सदाचार यासारख्या लहान मुलांच्या वयाला न पेलणाऱ्या गोष्टी त्यांनी आपल्या पाठ्यपुस्तकात ठेवल्याच नाहीत. या गोष्टींना त्यांचा विरोध होता अशातला भाग नव्हता परंतु मुलांना सहजपणे कसे शिकता येईल त्यांचे शिक्षण आनंददायी कसे होईल यावर त्यांचा भर होता. त्यांनी मुलांचे बालसृष्टीतील मित्र होऊन, त्यांच्या पातळीवर जाऊन या पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली. या पाठ्यपुस्तकातील एक एक धडा म्हणजे सुंदर शब्दचित्रच आहे ! सभोवतालच्या जगाचे निरीक्षण करता करता मुले सहजपणे यातून शिकत जातात आणि आपण काही शिकतो आहोत याची जाणीव न होता सहज शिकत जातात हे या पाठ्यपुस्तकांचे वैशिष्ट्य आहे. यातील पाठ गाता येतात, पाहता येतात, ऐकता येतात आणि अनुभवता येतात.

शांतिनिकेतनमध्ये त्यावेळी प्रख्यात चित्रकार नंदलाल बोस विद्यार्थ्यांना चित्रकला शिकवत. त्यांच्या सुंदर चित्रांनी ही पुस्तके नटलेली आहेत. रवींद्रनाथांचे शब्द आणि नंदलाल बोस यांची बोलकी चित्रे यांचा सुरेख संगम या पाठ्यपुस्तकांमध्ये झाला आहे. पु ल देशपांडे यांनी शांतिनिकेतनमध्ये काही काळ वास्तव्य केले होते. या पुस्तकांबद्दल बोलताना ते म्हणतात, ''माझ्या शांतीनिकेतन मधल्या वास्तव्यात या सहजपाठांनी माझे हरवलेले बालपण मला परत आणून दिले. ज्याला म्हणून बंगाली शिकायचे असेल त्याने सहजपाठाचे हे चार भाग पुन्हा पुन्हा वाचावेत. बंगाली भाषेच्या अंगाखांद्यावर खेळल्यासारखे वाटेल. सहजपाठ म्हणजे गुरुदेवांचे बंगालवर असलेले महान उपकार ! ''

बंगालमधील खेड्यात राहणारी मुले मुली डोळ्यासमोर ठेवूनच रवींद्रनाथांनी हे सहजपाठ लिहिले. सकाळचे वर्णन ते किती सुंदर करतात ते पहा

आलो हॉय – गॅलॉ भोय, चारी दिक झिक मिक –
( उजेड होतो, भय जाते, चारी बाजूला झुंजूमुंजू होते )

हे सगळे मुले गात गात आनंदाने म्हणू शकतात. सकाळ झाल्यानंतर गावातील माणसे कशी कामाला लागली याचेही चित्र सोप्या शब्दातून ते मुलांसमोर उभं करतात

पाडे पेरू हरी हर
मधू राय बांधे घर
होडी हाके पातू पाल
धान्य आणे जयलाल
धरे सुकाणू दीनानाथ
अविनाश रांधे भात.

आपल्याकडे शाळेतील मुलांना कविता पाठ केल्या की परीक्षेला मार्क मिळतात एवढेच ठाऊक. परंतु त्यातून मिळणाऱ्या आनंदाला ही मुले पारखी होतात. कविता या चालीवर सुंदर गाता येतात, त्या म्हणताना नाचता येते त्या गात गात भाषा शिकता येते, याची जाणीवच आमच्याकडे करून दिली गेली नाही. बंगालमधील मुले खरोखरच भाग्यवान म्हणावी लागतील कारण रवींद्रनाथांनी त्यांना शेकडो सुंदर गाणी रचून दिली. त्या गीतांना सुंदर चाली लावल्या गेल्या. बंगाली माणसाचे बालपण या गीतांनीच समृद्ध झाले. **(क्रमशः)**

# संघर्ष सकारात्मक सुद्धा !

**ज्योतिर्मय साहित्य**

संघर्ष म्हटलं की आपल्याला साधारणपणे भांडण तंटा असंच वाटतं. वास्तविक विचार केला तर ते तसं नसतं. संघर्षाचा केवळ भांडण किंवा वाद आणि विवाद इतकाच संकुचित अर्थ नाही. संघर्ष एक व्यापक व्यक्तिगत आणि सामाजिक क्रिया आहे.

संघर्ष कारण आणि निवारण याचा विस्तृतपणे विचार अनेक विचारवंतांनी केला. त्यात न्यायोचित संघर्ष हा विधायक स्वरूपाचा ही मानला गेला आहे. म्हणून संघर्ष हा सतत अनैतिक आणि विध्वंसत्मकच असतो असे नव्हे.

संघर्ष ही मानवाच्या परस्पर संबंधांमध्ये सतत कार्यरत असणारी एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. जेव्हा दोन व्यक्तींमध्ये परस्परांमध्ये सहकार्य नसते किंवा ते तटस्थ ही नसतात त्या वेळेसच परस्पर संघर्षाची स्थिती उत्पन्न होत असते. ऑक्सफर्ड डिक्शनरी नुसार, '' दोन वर्ग किंवा समूहांच्या मध्ये सशस्त्र विरोध युद्ध लढाई किंवा विवाद यास संघर्ष म्हटले आहे''.

संघर्ष करत असताना व्यक्ती किंवा समूह स्वतःच्या उद्देशांना प्राप्त करण्यासाठी विरोधकाच्या संबंधी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष हिंसात्मक क्रिया प्रतिक्रियेचा प्रयोग करत असतो.

वास्तविक पाहता संघर्ष हे परिवर्तनाचे एक प्रमुख साधन आहे. संघर्षाच्या सशक्त प्रक्रियेमध्ये उत्पन्न असंतोषाचे कारण आणि निमित्त समाप्त करून आवश्यक परिवर्तनाच्या दिशेने सामाजिक चेतना निर्माण करून उत्कृष्ट सिद्धांताचा परिचय दिला जातो. या प्रकारे क्रियांवीत संघर्षाची मात्र एक विशिष्ट छाप निर्माण होते.

मानवाच्या इच्छेला टाळता येत नाही म्हणून संघर्ष आवश्यक होऊन जातो. आणि जगाच्या पाठीवर ही त्याच जीव जाती अस्तित्वात राहिल्या आहेत ज्या की संघर्ष प्रिय होत्या. घटनाकार विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनीही सांगितलेले अत्यंत महत्त्वाचे मूल्यवान तत्व म्हणजे शिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा हेच. म्हणून न्यायोचित मागण्या आणि जन्मसिद्ध अधिकार प्राप्त होत नसतील तर संघर्ष हेच एकमेव नैतिक शस्त्र उरते.






ज्यावेळी संघर्ष विधायक स्वरूपात केला जातो त्यावेळी त्याचा उद्देश न्यायाची प्राप्ती आणि आपले हक्क मिळवणे व त्याचा प्रतिस्पर्ध्यांना आग्रह करणे यासाठी असतो. म्हणून न्यायोचित हक्कासाठी केलेला संघर्ष हा नक्कीच नैतिक, सकारात्मक आणि उन्नतीसाठीच असतो.

संघर्ष एकाच प्रकारचा नसून अनेक प्रकारचा असतो. व्यक्तीच्या मनात द्विधा परिस्थितीमध्ये द्वंद्व निर्माण होते. अनेक वैयक्तिक इच्छा आकांक्षा दमित होतात. याचेच कुंठित होण्यामध्ये रूपांतर होते. आणि ही कुंठा सहनशक्तीच्या बाहेर गेल्यानंतर याचेच संघर्षात आणि हिंसेत रूपांतर होते. मनुष्य आणि इतर जीवांमध्ये कधीकधी काही जाती प्रजाती दुसऱ्या जातीवरती शासन करण्याचा स्वतःला जन्मसिद्ध अधिकार समजतात. याच्याच परिणाम स्वरूप अन्य प्रजातींमध्ये यांच्याविरुद्ध संघर्ष भावना उत्पन्न होते. प्रजातीय संघर्षाचे प्रगती हे प्रमुख कारण आहे तर याशिवाय राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अधिक क्षेत्रांमध्ये जाती जातींमध्ये विषमता दिसून येते; त्याच्याही परिणाम स्वरूप परस्पर संघर्षाची बीजे रोवली जातात.

सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ कार्ल मार्क्स यांनी म्हटले होते, ''मानवी समाज सदैव दोन आर्थिक वर्गामध्ये विभागलेला असेल शोषक आणि शोषित. हे दोन्ही वर्ग सतत एकमेकांशी संघर्षरत असतील तोपर्यंत जोपर्यंत की वर्ग विहीन समाजाची स्थापना होणार नाही'' प्राचीन काळापासूनच मानव जातीमध्ये वर्ग संघर्ष पाहायला मिळतो. मालक नोकर, भांडवलदार आणि कामगार, याप्रकारे अनेक वर्गांमध्ये सतत संघर्ष दिसून येतो जो की आजही विद्यमान आहे.

व्यक्तिगत संघर्ष ,प्रजातीय संघर्ष, वर्ग संघर्ष, जातीय संघर्ष आणि राजनैतिक संघर्ष यापेक्षाही संघर्ष उत्पन्न होण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे विषमता आणि अन्याय हेच आहे. सामाजिक, आर्थिक व राजनैतिक क्षेत्रांमध्ये सतत शक्तिशाली कडून शक्ती हीनांवरती होणारा अन्याय संघर्षाच्या प्रक्रियेला जन्म देत असतो. या अन्यायाचे सातत्यच प्रतिशोध व विवादांना जन्म देतात. यामुळेच व्यक्ती समाज व राष्ट्र सतत संघर्षरत होत असते.

सामाजिक पातळीवर सुद्धा संघर्ष हा काही विशिष्ट परिणामांच्या प्राप्तीचे साधन आहे. संघर्ष विहीन समाजाची कल्पनाही केली जाऊ शकत नाही. सामाजिक जीवनातून देखील आम्ही संघर्षाला वेगळं करू शकत नाहीत. नैतिक आणि विधायक संघर्षाच्या समाप्तीचा अंतिम परिणाम हा शांतीस्वरूपच असतो.

संघर्षाचा मूळ आधार आणि कारण मात्र व्यक्तीच्या अनंत इच्छा लोभ या प्रवृत्तीच आहेत. इच्छेचा विस्तार हा अनेक प्रकारच्या हिंसेचे मूळ कारण असतो. इच्छापूर्तीसाठी दुसऱ्यांचे शोषण होते. उपार्जित पदार्थांच्या संरक्षणासाठी शस्त्रीकरण होते. या शस्त्रीकरणाचा अखेर युद्धाला जन्म देण्यात परिणाम होतो.

म्हणून संघर्ष जसे उत्कर्षाचे उन्नतीचे परिवर्तनाचे साधन आहे तसेच अन्याय आधारित उद्देश असेल तर मात्र त्यासाठी केलेला संघर्ष हा हिंसेला जन्म देतो आणि त्यातून अशांतीच निर्माण होते.

वर्णभेद, वर्गभेद, विषमता, उच्च नीच मानण्याची प्रवृत्ती, अतिलोभ, अधिकार व सत्तेचा विस्तार यासारख्या तत्त्वांमुळे सामाजिक आणि राष्ट्रीय स्तरावर संघर्ष निर्माण होतो आणि त्याचे मोठ्या प्रमाणात युद्ध आणि हिंसेमध्ये रूपांतर होते.

वैयक्तिक किंवा दोन व्यक्ती मध्ये किंवा व्यक्ती व्यक्तींमध्ये मात्र राग, द्वेष, लोभ, आसक्ती, क्रोध, मान, माया, लोभ, वासना, विकार भाव, विकृती, लालसा, संग्रह वृत्ती... अशा अनेक प्रवृत्तींमुळे एक प्रकारची अशांतता निर्माण होऊन त्यांच्यात परस्पर संघर्ष निर्माण होतो. मात्र त्याचा परिणाम हिंसा आणि अशांती हाच असतो.

म्हणूनच आज या ठिकाणी असे सांगावेसे वाटते की संघर्ष हा उन्नतीचे आणि परिवर्तनाचे मूळ कारण आहे परंतु तेव्हाच जेव्हा तो न्यायोचित मागणीसाठी आणि नैतिक आणि पवित्र उद्देशाच्या प्राप्तीसाठी नैतिक व अहिंसक मार्गाने केला जातो. हाच संघर्ष सकारात्मक असतो.

# कागज के फूल

**ज्योतिर्मय साहित्य**

वक्त ने किया क्या हसीं सितम
तुम रहे न तुम, हम रहे न हम''

या दोन ओळीतच पूर्ण गीताचं सार दडलं आहे. वक्त (काळ) ने इतकं सुंदर पण वेदनादायक असं काही घडवलंय की, पूर्वीचे ''आपण''ही राहिलो नाही.

''वक्त'' हा इथे केवळ वेळ नाही, तर एक अशी शक्ती आहे जी नातेसंबंधांवर, ओळखीवर, अस्तित्वावर आपली छाप उमटवते. अनेकदा अनपेक्षितपणे आणि क्रूरपणे.

तुम रहे न तुम, हम रहे न हम...''

हा केवळ प्रेमभंग नाही.

ज्यांचं प्रेम अपूर्ण राहिलं, त्यांनी स्वतःलाच गमावलंय या नात्यात.

गाणं कोणत्याही आक्रोशाशिवाय, अत्यंत संयमाने विरहाची वेदना व्यक्त करतं.

प्रेम टिकलं नाही, पण त्या आठवणींचा भार मनावर कायम राहतो.

गीता दत्त यांचा आवाज म्हणजे या गीताचा प्राण.

मन कातर करणारा स्वर पण तक्रार नसलेला.

त्या स्वरातले संयम, कारुण्य, आणि स्वीकृती हे या गाण्याला ''कालातीत'' बनवतात.




शब्दांकन
सविता कारंजकर

ही वेदना खूप खास आहे कारण ती केवळ विरहाची नाही, ती आयुष्याच्या अपूर्णतेची आहे.

कैफी आझमी यांचे शब्द, एस.डी. बर्मन यांचं संगीत. संगीत अगदी सौम्य, मंद स्वरातलं आहे. तबला, सरोद वगैरे वाद्यांच्या वापरातून एक नाजूक भावना व्यक्त होते.

गुरु दत्त यांचं छायाचित्रणातलं कौशल्य अप्रतिम.

प्रकाश-सावलीचा खेळ, मंद प्रकाशात उभी राहिलेली पात्रं, आणि रिकाम्या स्टुडिओची पार्श्वभूमी हे सर्व एकत्र येऊन अंतर्मुख करणारा एकाकीपणा उभा करतात.

हे एक कालातीत गीत आहे. केवळ प्रेमाचं, विरहाचं गाणं नाही, कुठलाही थेट दोष न देता, शांतपणे काळाला दोष देणं,

हृदयाला भिडणाऱ्या पण तक्रारीविना सांगितलेल्या वेदना शब्द, स्वर, छायाचित्रण यांचं अद्वितीय एकत्रीकरण या गाण्यात आहे.

यातील ''हसीं सितम'' म्हणजे सुंदर क्रौर्य ही संकल्पनाच इतकी प्रभावशाली आहे की हे गीत केवळ ऐकण्याचं नसून, अनुभवण्याचं आहे.

## ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ




## आठवणीतले बालपण

मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर

- संजय व्यापारी, संपादक,
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.

# दवाखाना

## क्षयरोग- भाग २




ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार मैत्रांनो!

नमस्कार मैत्रांनो!

आपल्यापैकी बहुतांश लोकांनी रणजीत देसाई यांची सुप्रसिद्ध स्वामी (१९६२) ही कादंबरी वाचली असेलच. श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांच्या जीवनावर आधारित या सर्वांगसुंदर कादंबरीत रमा-माधव यांचे उत्कृष्ट चरित्र रेखाटण्यात आले आहे. मी या लेखातील शेवटच्या कांही हृदयद्रावक प्रसंगांच्या आठवणीने नेहमीच व्याकुळ होते. राजयक्ष्मा या रोगाने ग्रसित हा अतिशय कर्तृत्ववान असा पेशवा! त्याच्या व्याधीचे करूण वर्णन आपल्याला यासाठी स्मरण करून देते की पेशवा काय किंवा सामान्य नागरिक काय, या दुर्धर रोगाची लागण झाली की त्याच्या महाभयंकर यातनांतून यमराजच त्यांची सुटका करायचा. मी बघितलेला 'आह' (१९५३) नांवाचा राजकपूर आणि नर्गिसचा एक सुंदर हिंदी सिनेमा होता. त्यात नायकाला क्षयरोग होतो. आधीच्या आवृत्तीत नायकाचा मृत्यू होतो, असा दुःखांत होता पण रिलीझच्या नंतर त्यात सुधारणा करीत तो क्षयरोगापासून मुक्त होतो आणि नायक-नायिका सुखाने जगतात असे दाखवले होते. साधारणपणे चित्रपटातील पात्राला टीबी आहे असे दाखवायचे असेल तर त्याला खोकल्याची उबळ येते आणि नंतर हातरुमालावर रक्त दिसायचे. ही पार्श्वभूमी यासाठी की टीबीचे निदान झाले की रोग्यासाठी स्वर्गाचे दार उघडायचे.

अशी परिस्थिती खरोखरच साधारण १९५० पर्यंत होती. रोग्याला सॅनिटोरियममध्ये धाडण्याचा हेतू हवापालटापेक्षा समाजातून सभ्यतेचे आवरण सांभाळून त्याचे निष्कासन व्हावे असाच असावा असे मला प्रकर्षाने वाटते. आपल्या प्रांतात मिरज येथे ब्रिटिश काळात टीबी रुग्णांसाठी एक प्रसिद्ध सॅनिटोरियम स्थापन झाले होते. हे सर्व यासाठी की टीबी हा दूषित हवेने होतो असा समज सर्वत्र होता. याचे श्रेय जाते सर विल्यम जेम्स वॅनलेस यांना (१ मे, १८६५ - ३ मार्च, १९३३). वॅनलेस-एफएसीएस अर्थात फेलो ऑफ द अमेरिकन कॉलेज ऑफ सर्जन्स हे कॅनडात जन्मलेले सर्जन मानवतावादी आणि प्रेस्बिटेरियन पंथाचे मिशनरी होते. त्यांनी १८९४ साली महाराष्ट्रातील मिरज येथे वैद्यकीय मिशनची स्थापना केली आणि जवळपास ४० वर्षे त्याचे नेतृत्व केले. या मोहिमेचा एक भाग म्हणून, डॉ. वॅनलेस यांनी १८९७ मध्ये महाराष्ट्रातील पहिल्या मिशनरी मेडिकल स्कूलची स्थापना केली आणि कुष्ठरोग सॅनिटोरियम तसेच क्षयरोग रुग्णालय स्थापन करण्यात मदत केली. क्षयरोग हा एक जिवाणुजन्य आजार आजकाल बऱ्याच अंशी बरा होणारा आजार आहे (नियम व अटी लागू)! एके काळी हा रोग दुर्धर समजला जाई. सामान्यतः या आजाराला टीबी (ट्युबरक्युलॉसिस) म्हणून ओळखले जाते. हा आजार मायकोबॅक्टेरिया या प्रकारच्या जिवाणूंमुळे होत असतो. त्यातील मुख्यत्वेकरून मायकोबॅक्टेरियम ट्युबरक्युलॉसिस या जिवाणूंमुळे माणसाला क्षयरोग होतो. यात सामान्यतः ७५% रुग्णांमध्ये फुफ्फुसांना बाधा होते. काही रुग्णांमध्ये फुफ्फुसेतर अवयवांनाही बाधा होत असते. असे आढळून आले आहे की जवळपास ३५ टक्के वा जास्त लोकांच्या शरीरात क्षयरोगाचे जिवाणू वास्तव्य करून असतात. परंतु या सर्वांनाच क्षयरोग होत नाही कारण हे जिवाणू निद्रिस्त अवस्थेत असतात. पण शरीरातील प्रतिकारशक्ती कमी झाल्यास हे झोपी गेलेले जिवाणू जागे होतात.



लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

बीसीजी लस- लिओन चार्ल्स अल्बर्ट कॅल्मेट आणि जीन-मेरी कॅमिल गुएरिन या दोन शास्त्रज्ञांनी 'बॅसिलस कॅल्मेट-गुएरिन' (बीसीजी) लस शोधली. त्यांनी फ्रान्सच्या पाश्चर इन्स्टिट्यूटमध्ये १३ वर्षे अथक मेहनत करीत ही लस विकसित करण्यासाठी काम केले. या संशोधकांनी ही लस मूलतः 'मायकोबॅक्टेरियम बोव्हिस' पासून विकसित केली. हे जिवाणू गायींमध्ये आढळतात आणि त्यांच्याद्वारे होणारा टीबी कमी तीव्रतेचा असतो. तसेही लसीचे उत्पादन करतांना जीवाणूंना अर्धमेले अथवा मंदबुद्धी केल्या जाते, यामुळे लस दिलेल्या माणसाला रोग तर होत नाही, पण 'सुंभ जळाला तरी पीळ जात नाही' या न्यायाने त्यामुळे निर्माण होणारी प्रतिकारशक्ती उत्तमच असते. मंडळी, बीसीजी लस प्रथम १९२१ मध्ये वैद्यकीय पद्धतीने वापरली गेली, मात्र भारतात ती १९४८ सालापासून रूढ झाली. आपल्या देशात टीबीचा प्रादुर्भाव असल्याने बीसीजी ही प्राथमिक लसीकरणाचा अविभाज्य भाग आहे. क्षयरोग रोखण्यासाठी सध्या उपलब्ध असलेली ही एकमेव परवानाकृत लस आहे, हे ध्यानात असावे.

पुढील भागातही चर्चेचा विषय क्षयरोगच! ***


## मेहनतीने मिळालेल्या गोष्टींचा आनंद आणि कष्टाचे चीज

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)



वर्तमान संस्कृतीची वास्तविकता, समस्या, आयुष्याप्रती अपेक्षा भंग, राजकीय क्षोभ, सत्ताधारी पक्षांचे चुकीचे निर्णय, विविध प्रश्न यांमुळे निराश झालेल्या शुनःशेपरुपी माणसाचे सजीव चित्रण या काव्यसंग्रहामधून होते. सध्याच्या जीवनातील प्रश्न उभे करणे या महत्वाच्या उद्देशाने शुनःशेप कविता संग्रहाचे सृजन झाले आहे. हे सर्व कवितांमध्ये स्पष्ट किंवा अभिधात्मक पद्धतीने नाही तर अधिकांशतः सांकेतिक आणि प्रतीकात्मक पद्धतीने झाले आहे. याचबरोबर कविता संग्रहामध्ये सामान्य माणसाच्या तरल संवेदना आणि कोमल प्रेम भावना देखील काही कवितांमधून अभिव्यक्त झाली आहे. शुनःशेपमधील काही कवितांचा अनुवाद केल्यानंतर काही संदर्भाची चर्चा खुद्द डहाके सरांशी आणि प्रभा गणोरकर मैडम यांनी काव्यसंग्रहातील अनेक कवितांच्या निर्मितीचे सप्रसंग केलेले विश्लेषण माझ्यासाठी महत्वाचे ठरले. आयुष्यात प्रथमतः डहाके आणि प्रभा गणोरकर यांची झालेली सखोल साहित्यिक चर्चा, विश्लेषण यांमुळे अनुवादाकडे आणखी वेगळ्या पद्धतीने पाहण्याची दृष्टी विकसित झाली.

अनुवाद ही पुनःसृजनाची प्रक्रिया आहे त्यामुळे नेहमीच एक सृजन केल्याचा आनंद होतो. सृजनाची एक निराळी मानसिक प्रक्रिया असते ज्यामध्ये नवीन विचार, उपाय, संकल्पनांचा जन्म होतो. मौलिकता, सम्यकता जशी मूळ लेखनामध्ये असते, तशी अनुवादामध्येदेखील अपेक्षित असते. शुनःशेपचा अनुवाद करताना या गोष्टींबाबत अधिक चिंतन करणे मला शक्य झाले. अनुवादामध्ये कधीही अनुकरण असू नये परंतु समतुल्यता अनिवार्यतः असावी. मूळ रचनेमधील अनुभूती, आशय, अभिव्यक्ती अनुवादामध्ये यथावत आणणे ही अनुवादकाची जबाबदारी असते. अनुवादामध्ये जिवंतपणा, रसात्मकता निर्माण करण्यामध्ये अनुवादकाच्या प्रतिभेची परीक्षाच होत असते. शुनःशेपचा अनुवाद करणे ही माझ्यासाठी अनुवादक म्हणून जशी मोठी संधी होती त्याचप्रमाणे ती वसंत आबाजी डहाके यांच्या काव्यसंग्रहाचा अनुवाद करणे ही मोठी जबाबदारी होती.




शुनःशेपची गुणवत्ता आणि त्यातील विषयांची व्यापकता ही या काव्यसंग्रहाला कालातीत बनवते. त्यामळे त्याच्या प्रकाशनाच्या इतक्या वर्षांनतरदेखील त्याचे महत्व कमी झालेले नाही. शुनःशेपच्या निमित्ताने श्रेष्ठ कवि वसंत आबाजी डहाके यांच्या संपूर्ण मराठी काव्यसंग्रहाचा हिंदीमध्ये सर्वप्रथम अनुवाद करण्याचे कार्य माझ्या हातून घडले याबाबत मला अत्यंत आनंद होत आहे. मूळ कविने अनुवाद समतुल्य झाल्याची प्रतिक्रिया देणे, हे अनुवादकासाठी खूप महत्त्वाचे असते, वसंत डहाके यांनी अनुवादाच्या प्रकाशनाच्या समारंभात म्हणाले होते की ''अनूदित कविता मूळ हिंदीच वाटत आहेत. ''अशाच भावना मराठी आणि हिंदी साहित्य जगातील अनेक विद्वानांनी व्यक्त केली होती. विविध स्तरांमधून यातील अनुवादित कवितांच्या विडिओंना सोशल मीडियावर देखील वाचकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. पुस्तक महोत्सवात सुद्धा या अनुवादाची दखल वाचकांनी घेतली आहे याचा मला अनुवादक म्हणून आनंद आहे.

महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीने योग्य न्याय करीत अनुवादाला पुरस्कृत केले अशी माझी भावना आहे. अत्यंत आव्हानात्मक रचनेच्या अनुवादासाठी सार्थक पोच पावती म्हणजे काल मिळालेला महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी पुरस्कार. या अनुवादाच्या माध्यमातून मराठी आणि हिंदी भाषांचे सेतु म्हणून कार्य घडल्याचे समाधान तर आहेच. तुम्हां सर्वांच्या प्रेमामुळे आनंद द्विगुणित झाला. पुनः एकदा वसंत डहाके सर, प्रभा गणोरकर मॅडम, आई-बाबा, गुरुजन, मनोज पाठक व वर्णमुद्रा प्रकाशन, कपिल भारद्वाज, व शिल्पायन प्रकाशन, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटी व मॉडर्न महाविद्यालयाचे सर्व पदाधिकारी, आमची शकुंत विहार फॅमिली, हिंदी विभागातील माझे सहकारी, मित्र मैत्रिणी, सर्वांचे मनःपूर्वक आभार. (आमचे प्रकाशक मनोज सर म्हणतात तसे.. और तेरेकु क्या चाहिए ?)

डॉ. प्रेरणा उबाळे
लेखिका, अनुवादक; पुणे/
अध्यक्ष, हिंदी विभाग
मॉर्डन महाविद्यालय, पुणे ०५

***

## कवितेच्या लाटावर...

### बेट

असावे असे ही बेट
निवांत विसाव्यासाठी
भागलेला शीण जावा
मिळावी मनाची शांती....१
या बेटावरही असावे
जिवलग खरे नाते
नसावा धोका फसवा
माणुसकीला ते हसे.....२
प्रेम जिव्हाळा नि लळा
भरभरून मिळावा
राग द्वेष मत्सरास
थारा येथे न लाभावा.....३
तहानल्या या आत्म्याला
दिलासा येथे मिळावा
नसावी गोर गरिबी
नीच कोटी विचारांची.....४
लखलख सूर्यासम
लेवुनी विचारधारा
लीन कोटी विचारास
देऊ नये कधी थारा ......५
पचवू रुजवू नाते
आनंदाच्या या बेटाशी
उच्च कोटी विचारांची
बांधुनी गाठ मनाशी.....६
बेट हळवे आनंदाचे
उधळे अर्थ मैत्रीचा
विश्वासाचा मिळे खरा
आधार लळा खात्रीचा.....७
आयुष्याला कलाटणी
देई असे बेट गडे
आपसूक रवानगी
इथे मनाचीच घडे.....८
आल्हाददायी विसावा
घेण्या जीव आसुसला
मिळे ना बेट असे कोठे
मनाने हिरमुसला..........९

सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

### ट्रॅप खरा...




हनी ट्रॅप हे गोड नाव
जणूं सोन्याचापिंजरा
भलेभले फसतीत्यात
विचारआधी कराजरा
काळीज काळेकभिन्न
सुरेख दिसतो चेहरा
लुटूनि जाती चारित्र्य
नसतो कुणाचा पाहरा
मोह कस्तुरी मृगाचा
तोल वेळेवरी सावरा
फुगा फुगला भ्रमाचा
फुटण्या आधि आवरा
स्वतःभोवती मदमस्त
फिरत राहतो भोवरा
सापळा नाही दिसला
गुढग्या बाशींग नवरा
नाद खुळा होई भला
बाईचा चालतो नखरा
प्रश्न तसाचं लोंबकाळे
कोण आहे खोटाखरा
उच्चपदस्थ अधिकारी
सहज होतात बकरा
कार्य सिद्धी होईल तो
मालकबोलता नोकरा
फसवलो गेलो कळता
यायला लागती चकरा
सभ्य म्हणवतो स्वता
तुरुंगात मारा चकरा

- हेमंत मुसरीफ पुणे .

### एकाकी

मुक भावनांचा सागर,
कल्लोळातल्या त्या लाटा.
सांजेला शोभे किनारी नाव,
अस्तास हसऱ्या टोचरा काटा..१..
हुरहुरत्या कातर वेळी
वेड लागे हळवे उगी जीवा.
आठवांचा उफाळून येई
तो अनमोल असा ठेवा..२..
स्मरणे ती स्मरणात
सागरी त्या उसळतात.
नव्या लाटेवर स्वार होण्या
पुन्हा सागरी विसावतात..३..
वादळातल्या भोवऱ्यात
एककल्ली सैरभैर व्हावं,
एकांती स्थिर अस्थिर
भावनेनं गलबलून जावं..४..
अंकुरल्या अंकुराचे अन्
मातीचे अस्तित्वाचे नाते,
माया, ममता, वात्सल्य चे
मोल अनीतीत का होते..५..
मातीतून आलो, मातीत जाणार,
एकाच वाटेचे सारे वाटेकरी तरी
विचार कर मानवा निर्ढावलेल्या
वाटेवरचीच घेऊन जाणार का तू शिदोरी..६.

©सौ. वैशाली इंदुमती जाधव - महाडिक.
सातारा मो. क्र.- ९७६७४३७९२३




### सरकार माणसांचे
(गझलवृत्त- आनंदकंद)

येथे हवेत निर्मळ, व्यवहार माणसांचे
मेलो तरी उरावे, संस्कार माणसांचे
शांती दया प्रितीचा, जेथे मिलाफ आहे
त्याला खरे म्हणावे, घरदार माणसांचे
काही अती विषारी, काही लबाड बोके
होतात का अशाही, सत्कार माणसांचे
युद्धे लुटूपुटूची, लढतात रोज नेते
केव्हा भले जरासे, करणार माणसांचे
बस एक मावळ्याने,गड राखला पन्हाळा
का हो तसे दिसेना, किरदार माणसांचे
आदर्श शब्द ज्यांच्या, ओठात ना कधीही
लिहितात ते फळ्यावर, सुविचार माणसांचे
गरिबास भाकरी अन् सन्मान वंचिताला
रज्जाक एक यावे, सरकार माणसांचे

रज्जाक शेख
श्रीरामपूर, 9665778558

### "जीवनभाषा"

फुलली पहाट बहारदार माझिया जीवनी
फुले फुलली झाडांवरी देत सुगंध अंगणी

कुजबूज करीत पवन येतो खेळण्या अंगणी
संवाद साधिती फुलपाखरे फुलास चिकटूनी

बसूनी झाडांवरी पक्षी गाती मस्त मंजुळगाणी
झाडेही देतात साथ त्यांना निज पाने हलवूनी

प्राजक्ताचा सडा पडला सुगंध देत मस्तअंगणी
सख्यासाजणीनी फुलवावा प्रेमसुगंध जीवनी

जाण यावी मानवी मनांस सद्गुणांची!फुलूनी
सकल व्हावे आनंदी एकमेका समजून घेऊनी

कसे जगावे!शिकवितो निसर्ग मानवा!जीवनी
का न समजते! मानवास जीवनभाषा जीवनी!

अखंड राहतो कार्यरत निसर्ग!मानव सुखासाठी
माणूस मात्र आहे तोडत निसर्ग!बहू पैशांसाठी

काव्यरचना: मधुकर ए. निलेगावकर,पुणे
९४२१३७५६९१

### शब्दांच्या पलीकडले

शब्द स्मरावे, शब्द जपावे
शब्द साठवावे, शब्द करावे शब्दबद्ध.
वापरावेत मात्र जपून
काहींची चव असते गोड, तर काहींची तिखट
कडवट देखील असतात साथीला
आपण मात्र साधावा मेळ,
अन करावी शब्दांची सुंदरशी भेळ.
शब्दांची गंमत असते न्यारी,
शब्दांची सोडवावी लागतात कोडी.
शब्द येतात हातात हात गुंफून,
कुणी रचतात कविता, तर कुणी गझल.
शब्द करतात खेळ, शब्द करतात छळ
शब्द करतात घायाळ, तर कधी हळवे,
शब्दांना असते धार, शब्द करतात वार
शब्द देतात जखमा, शब्दच तर लावतात मलम.
शब्द हसवतात तसचं रडवतात सुध्दा.
शब्द पडतात खाली, झेलले देखिल जातात
शब्द पाळणारे असतात तसे मोडणारेही असतात.
शब्द देताना द्यावा तोलून मापून,
शब्दांकडे लक्ष द्यावे नीट, होतो कधीतरी ' ध' चा '
मा'.
शब्द शब्द ठेवावे जपून,
शब्द लागतातच असं काही नाही
समजून घेण्या शब्दांच्या पलीकडले......

© शेखर देशपांडे

### वासुदेव

कोंबड्याने बांग दिली या पहाटेच्या पारी
आला बघा वासुदेव, मोरपीस त्याच्या शिरी

वासुदेवाच्या रूपात देवच हा आला घरी
माप भरुनिया टाका सारे त्याच्या हो पदरी

आशीर्वाद देण्या जणू वासुदेव दारी आला
आनंदाचा सडा माझ्या साऱ्या अंगणी पडला

उगवला सूर्यदेव, गाव सारे जागे झाले
वासुदेवाचे दर्शन भल्या पहाटेच झाले



✍️उद्धव भयवाळ
छत्रपती संभाजीनगर
मो. ८८८८९२५४८८



### हम्मा हम्मा मम्मा...

सांग खल खल
शाळेत मला कधी
तु टाकणाल बल???

घेईन दप्तल पाठी
चालेन लुतुलुतु
पण पिऊन जाईन
आधी दुदु चुतुचुतु.. ,!!

अभ्यास मी करणाल
म्हणीन अ, आ, ई
त्रास तुला कध्धी
कध्धी देणाल नाही,,,!!

चल बल लवकर
सुटेल शाळा बाबा,
घेउन टाक पतकन्
माझा गोड पापा,,,!!

आला फोन माऊचा
की सांग तिला बल
पिल्लु माझ गोल गोल
शाळेमध्ये गेल,,,!! 😘

©®
सौ. मनोरमा बोराडे
शिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559